# प्रेस नोट ता. २४/०५/२०२३     पोलीस स्टेशन - वाकड

## दिवसा घरुफोडी करणा-या सराईत गुन्हेगारास अटक घरफोडीचे ०३ गुन्हे उघड करत कि.रु.१२,२०,०००/- चे २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने जप्त

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

उन्हयाळयाचे सुट्टीचे निमीत्त पिंपरी चिंचवड परीसरातील असंख्य रहीवासी आपली राहती घरे बंद करुन गावी जात असतात. त्यामुळे मोठया प्रमाणावार घरफोडीचे गुन्हयामध्ये वाढ होते असते. त्याअनुषंगाने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग करणेबाबत तसेच गुन्हे प्रकटीकरण विभागास सक्त पेट्रोलींग करुन घरफोडीचे गुन्हयांना आळा घालणेबाबत आदेश दिले आहेत.

दि.१७/०५/२०२३ रोजी ११.३० वा ते १७.१५ वा दरम्यान सनं.२८/१ शिवराजनगर रहाटणी पुणे येथे चंद्रकांत बाळकृष्ण चव्हाण वय ४८ वर्षे रा.सनं.२८/१ शिवराजनगर रहाटणी पुणे यांचे बंद घराचे कडी कोयंडा कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडुन घरात प्रवेश करुन घरातील १० तोळे वजनाचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा ऐवज घरफोडी चोरी करुन नेला वगैरे मजकुरचा गुन्हा रजि.नं. ४८२/२०२३ भादविक ४५४,३८०अन्वये दाखल झाला.

त्या अनुषंगाने मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकातील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून गुन्हे घडणारी वेळ व वारंवार गुन्हे घडणारे एरीया मध्ये प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करत सापळा कारवाई व वाकड पोलीस स्टेशन हद्दीत वेगवेगळया ठिकाणी नाकाबंदी करुन गुन्हयांना आळा घालणे व आरोपींना पकडुन गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक व पांरपारीक पध्दतीने तपास सुरु केले. सपोनि.संतोष पाटील व त्यांचे सोबतचे पोलीस स्टाफ पेट्रोलींग करीत जगताप डेअरी ब्रिजखाली येवुन थांबले असता त्यांना तेथे अॅक्टीव्हा मोपेडवरुन एक फिकट निळे रंगाचा टिशर्ट घातलेला इसम येताना दिसला. सदरचा इसम हा शिवराज नगर रहाटणी पुणे येथे घडलेल्या घरफोडीतील संशयीत इसमा सारखा वाटला. परंतु सदरचा इसम पोलीसांना पाहताच तेथुन पळुन जाण्याचा प्रयत्न करताच त्यास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्याने आपले नावे सचिन भिमराव पाटील वय ३२ वर्षे रा. भारत फोर्स कंपनीजवळ, साईपार्क, घोरपडी गाव, घोरपडी पुणे असे सांगीतले.

सदरचे इसमास ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला मागील बाजुस घराचे कडी कोयंडा तोडण्यासाठी वापरलेला एक स्टिलचा छोटा रॉड खोचलेला मिळुन आला. सदरचा इसम हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी देखील ०५ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत हे निष्पन्न झालेने त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने वाकड व चतु:श्रृंगी भागातील बंद घर फोडुन घरफोडी केल्याची कबुली दिलेने त्याचेकडुन ०३ गुन्हे उघड करुन **१२,२०,०००/- रुपये किंमतीचे २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने** हस्तगत करण्यात आले असुन तपास चालु आहे.

**आरोपीकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ४८२/२०२३ | भादविक ४५४,३८० |
| २ | वाकड | ३६४/२०२३ | भादविक ४५४,४५७,३८० |
| ३ | चतु:श्रृंगी | ३३६/२०२३ | भादविक ४५४,३८० |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे,पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, तसेच परिमंडळ-०२ कडील पोशि.पंडीत यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड

अटक आरोपी सचिन भिमराव पाटील वय ३२ वर्षे रा. भारत फोर्स कंपनीजवळ, साईपार्क, घोरपडी गाव, घोरपडी पुणे याचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गुन्हा रजि.नं. कलम |
|---|---|---|
| १ | चंदनगर, पुणे शहर | ११५/२०१६ भादविक ४५४,३८० |
| २ | चंदननगर पुणे शहर | २१६/२०१९ भादविक ४५४,३८० |
| ३ | चंदनगगर पुणे शहर | ३२४/२०१९ भादविक ४५४,३८०,३४ |
| ४ | मुंढवा | १२१/२०१७ भादविक ४५४,४५७,३८० |
| ५ | हडपसर | ३४७/२०१७ भादविक ४५४,३८० |